**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,**
**स्वच्छ भारत मिशन (ग्रा.)**
**जिल्हा परिषद, वाशिम.**

ई मेल sbmzpwashim@gmail.com

जा.क्र./ जिपवा/DWSM/ 187 /२०२१
जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद वशिम
दिनांक- 31 / 3 /२०२१

# जाहिरात नमुना

## महाराष्ट्र शासन

**( जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जि. प. वाशिम.)**
**स्वारस्य अभिव्यक्ति (EOI)**

**Exppression of Interest Notice**

**स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा २ अंतर्गत व्यवसायिक संस्था / स्वंयसेवी संस्था म्हणून काम करु इच्छिणाऱ्या संस्थांची विहीत नमुन्यात सुची करण्यासाठी आवेदन.**

स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा २ अंतर्गत वाशिम जिल्हयात सन २०२०-२०२१ साठी निवडक ग्रामपंचायती मध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प कामाकरीता सर्वेक्षण करणे अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे / आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/ सहाय्य प्रदान करणे करीता पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील काम करणाऱ्या व्यवसायिक संस्था / स्वंयसेवी संस्था यांच्याकडून सहयोग देण्याची इच्छा असेल त्यांच्याकडून अर्ज या कार्यालयाकडे मागविण्यात येत आहेत. याबाबत कामाचे प्रारुप, अटी व शर्ती www.zpwashim.in संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**अर्ज स्विकारण्याची अंतिम तारिख : १२/०४/२०२१ रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत**

**अध्यक्ष,**

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, वाशिम ४४४५०५
ई मेल sbmzpwashim@gmail.com

Scanned by CamScanner

जिल्हा परिषद, वाशिम

**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, वाशिम.**

## स्वारस्य अभिव्यक्ति (EOI) फॉर्म

कामाचे नांव :- घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प कामाकरीता सर्वेक्षण करणे अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/ सहाय्य प्रदान करणे.

व्यवसायिक संस्था/ स्वंयसेवी संस्था नांव व पत्ता :- ----------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

Scanned by CamScanner

## प्रपत्र अ

| अ.क्र. | तपशिल | |
|---|---|---|
| १ | व्यावसायिक संस्था/ स्वंयसेवी संस्था नाव | |
| २ | कार्यालयाचा पत्ता व संपर्क क्रमांक, ईमेल आयडी | |
| ३ | संपर्क करावयाचे व्यक्तीचे नांव व संपर्क क्रमांक | |
| ४ | व्यावसायिक संस्था/ स्वंयसेवी संस्था नोंदणी प्रमाणपत्र | सोबत जोडावे |
| ५ | GST प्रमाणपत्र | सोबत जोडावे |
| ६ | मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र | सोबत जोडावे |
| ७ | जाहिरातीत नमुद केलेले कामाबाबतचे अनुभव प्रमाणपत्र | सोबत जोडावे |

**सही व शिक्का**

## प्रपत्र ब

| अ.क्र. | तांत्रिक मनुष्यबळाचा तपशिल (किमान ५ ) | | |
|---|---|---|---|
| | नांव व पदनाम | शिक्षण | अनुभव |
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |

**सही व शिक्का**

Scanned by CamScanner

# अटी व शर्ती

१. सदर निविदेचे दर कार्यारंभ आदेशापासून १ वर्षापर्यंत वैध राहतील. याबाबत मधील कालावधीत शासनाकडून दर कपात झाल्यास त्यानुसार अथवा शासनाकडून प्राप्त झालेल्या निर्देशनानुसार बदल होईल.

२. व्यावसायिक संस्था/ स्वंयसेवी संस्था यांना सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.

३. जागेची उपलब्धता / परवाने यांची खात्री करुन प्रस्ताव सादर करावेत. प्रस्ताव तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी मिळेपर्यंत त्यामध्ये होणाऱ्या बदलानुसार प्रस्तावातील बदल आहे त्याच किंमतीत करावा लागेल.

४. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPI) ची तपासणी करुन दिलेल्या नमुन्यानुसार व बरोबर असल्याची खात्री करुन वरीष्ठ कार्यालयाच्या परवानगीने व निर्देशानुसार, एम्पॅनेलमेंट व्यावसायिक संस्था/ स्वंयसेवी संस्था यांनी सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला / सहाय्य प्रदान करणे याबाबी करीता, ग्रामस्तरीय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापना करीता तसेच जिल्हास्तरीय प्लॉस्टिक वेस्ट मॅनेजमेंट, महिला व्यवस्थापन (फिकल स्लज मॅनेजमेंट ) व गोर्वधन करीता प्रत्येकी अनुज्ञेय असलेल्या निधीच्या ५% किंवा १,००,०००/- (रुपये एक लक्ष फक्त ) यापैकी जी कमी असेल त्या रक्कमेची तरतुद प्रकल्पाच्या अंदाजपत्रकामध्ये अंर्तभुत करावी. सदर रक्कम अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट नसल्यास रक्कम अनुज्ञेय नसणार नाही. व्यावसायिक संस्था / स्वंयसेवी संस्था यांना शुल्क म्हणून शासन स्तरावरुन संबंधीत गावाच्या घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी निधी उपलब्ध झाल्यानंतरच ग्रामपंचायती मार्फत अदा करण्यात येईल.

**५. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प आराखडयामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.**

**अ. घनकचरा व्यवस्थापन.**

१. सार्वजनिक कंपोष्टपीट

Scanned by CamScanner

२. ट्रॉय सायकल, बॅटरी ऑपरेटेड ट्रॉय सायकल.

३. गावासाठी प्लॉस्टीक कचरा साठवण करण्यासाठी शेडचे बांधकाम करणे.

४. कुटूंब स्तरीय कचरा कुंडया.

५. सार्वजनिक स्तरीय कचरा कुंडया.

६. कुंटूंब स्तरीय कंपोष्ट पीट.

७. कचरा वर्गीकरण साठवण व कंपोष्ट प्रकल्प परिसराचे व्यवस्थापन.

८. कचरा गोळा व वर्गीकरण करणे, यासाठीचे अदा करावयाचे मानधन / वेतन.

९. कचरा वर्गीकरणासाठी आवश्यक अवजारे.

१०. परिसर स्वच्छतेसाठी आवश्यक अवजारे.

११. घनकचरा व्यवस्थापनाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती.

**ब ) सांडपाणी व्यवस्थापन**

१. सार्वजनिक शोषखड्डा, मॅजिक पिट/ पाझर खड्डा.

२. कुटूंब स्तरीय शोषखड्डा, मॅजिक पिट/ पाझर खड्डा.

३. स्थिरीकरण तळे, Dewats, नाल्या व बंधिस्त गटारे etc.

४. सांडपाणी व्यवस्थापनाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती.

५. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थानाबाबत काम करीत असतांना केंद्र शासन व राज्य शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या मार्गदर्शक सुचना नुसार काम करणे बंधनकारक आहे.

६. आदेशाच्या तारीखेपासून १५ दिवसांत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन संबंधीत उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग यांचेकडे सादर करणेचे आहेत.

७. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR ) तयार करणेस विलंब झाल्यास आपण दंडास पात्र राहाल. (दंड किती आकावयाचा याबाबत मा. मु.का.अ. यांचे आदेशअंतिम राहतील.)

८. सदरचे दर सन २०२०-२०२१ च्या आर्थिक वर्षासाठी लागू राहतील. आर्थिक वर्ष संपल्यानंतर आवश्यक असल्यास मुदतवाढ देणे किंवा नविन दरपत्रक मागविणे ही बाब उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व.स्व.) यांच्या अधिकारात राहील.

Scanned by CamScanner

९. वेळोवेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पा.व.स्व.) व कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) तसेच वरिष्ठ कार्यालयाने दिलेल्या लेखी व तोंडी सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१०. निवड केलेल्या संस्थेने संबंधीत ग्रामपंचायतीची १०० रु. स्टॅम्पवर सविस्तर अहवाल (DPR) कामाबाबत करार करावा.

११. निवड केलेल्या संस्थेचे करार कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

१२. सांडपाणी व घनकचरा प्रकल्प व्यवस्थापनाकरीता एका पेक्षा जास्त संस्थाचे पॅनेल तयार करुन प्रस्तावीत प्रकल्पांची गांवे वाटप करण्याचा अधिकार या विभागाकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

१३. उपरोक्त प्रपत्र अ व ब तसेच अटी व शर्ती मान्य असल्यासबाबतचे प्रमाणपत्र या सोबत सादर करावे.

१४. उपरोक्त प्रपत्र अ व ब यांची माहिती भरुन तसेच अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद वाशिम या कार्यालयाकडे बंद लखोटयात विहीत मुदतीत सादर करावे. विहीत मुदतीनंतर सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| कार्यकारी अभियंता<br>ग्रामीण पाणी पुरवठा विभाग<br>जिल्हा परिषद वाशिम | प्रकल्प संचालक<br>जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन<br>जिल्हा परिषद वाशिम | मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद वाशिम |

Scanned by CamScanner